# <u>वार्तापत्र</u>

-

पोलीस अधिक्षक कार्यालय
गडचिरोली दिनांक २०/१२/२०१८

## *पोलीसांकडुन शेतक-यांना शेतीचे धडे*

**=> <u>एका एकरात घेतले ३५ बोरी धान्य</u>**

मा. पोलीस अधिक्षक शैलेश बलकवडे सा़ो., मा. अपर पोलीस अधिक्षक महेंद्र पंडित सा़ो., मा. अपर पोलीस अधिक्षक हरी बालाजी सा़ो., मा. अपर पोलीस अधिक्षक बन्सल सा़ो. अहेरी, मा. अपर पोलीस अधिक्षक मोहीत गर्ग सा़ो, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी बजरंग देसाई सा़ो. यांचे मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील अति दुर्गमभागात उपविभाग अहेरी अंतर्गत येत असणा-या उपपोस्टे पेरमिलीचे प्रभारी अधिकारी, श्री महेश मतकर व पो. स्टाफ हे आपल्या हद्दीतील शेतक-यांना एकत्र करुन त्यांना आधुनिक शेतीचे प्रशिक्षणदेत आहेत.

पेरमिली चे प्रभारी अधिकारी व पो. स्टाफ यांनी या हंगामात उपपोस्टे पेरमिली हद्दीतील श्री चांदेकर यांच्या एक एकर शेतीत ३५ बोरी धान उत्पादन घेवुन येथील शेतक-यांना आधुनिक पध्दतीने पिक उत्पादन कसे घ्यावे याचे धडे दिले आहेत. मागील वर्षी याच एक एकर शेतामध्ये या शेत मालकांनी हलक्या प्रतीचे २ बोरी धान्य उत्पन्न घेतले होते.

यानंतर पोउपनि मतकर यांनी रब्बी हंगामासाठी सरी पध्दतीने दोन गुंठे जागेवर मिरची चा डेमो प्लॉट तयार करुन मिरची पिकांमध्ये कांद्याचे आंतर पिक घेण्याचा उपक्रम राबविला आहे. सदर प्रशिक्षणासाठी मौजा आलदंडी या गावातील शेतक-यांनी पुढाकार घेतला आहे. पोलीस दलाच्या पुढाकाराने करण्यात आलेल्या या प्रयत्नांमुळे गावातील जनतेत आनंदाचे वातावरण असुन एवढ्या मोठ्या प्रमाणावर आपण धान्य पिकवु शकतो. यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता. पोलीस दलाने ग्रामीण जनतेसाठी सुरु केलेल्या या प्रकल्पामुळे आम्हाला मोठ्या प्रमाणावर लाभ होईल असे मत येथील पंचक्रोशीतील नागरीकांनी व्यक्त केले आहे.




BALIRAJA